# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/07/2020 (शनिवार)
(दुपार)

---

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा काचुरवाही येथे दिनांक 13/07/2020 चे 16.30 वा. ते 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– समाधान शंकरराव वानखेडे, वय 55 वर्ष, रा. न्यु ब्राम्हणी, कळमेश्वर हे ग्रामविकास अधिकारी या पदावर ग्रामपंचायत काचुरवाही येथे कार्यरत आहेत. फिर्यादी हे ग्रामपंचायतीचे विशेष मासीक सभेत गावचा बाजार भरवीने या संदर्भाने झालेल्या ठरावानुसार ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य सहकारी यांचेसह कोरोना प्रादुर्भाव पार्श्वभुमीवर बाजारात जाउन लोकांना सुचना तथा ठरावाबाबत सांगत असतांना आरोपी नामे– कमलेश बापुरावजी सहारे, वय 45 वर्ष, रा. काचुरवाही, रामटेक याने तेथे येवून फिर्यादी व सरपंच यांना अश्लिल शिवीगाळ व धक्काबुक्की करुन 'तुला ॲट्रॉसीटीच्या गुन्हयात अडकविल' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 353, 188, 51(इ) भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कोळेकर 9834323960 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत कनसी/11 ऑफीसर कॉलोनी वाघोडा येथे दिनांक 17/07/2020 चे 16.16 वा. सुमारास फिर्यादी नामे– अमित कुमार राशी भुषण कुमार सिन्हा, वय 35 वर्ष, रा. ऑफिसर कॉलनी डब्लु. सी. एल सावनेर यांच्या मोबाईल वर अज्ञात आरोपीने फोन करुन म्हटले की, ''तुमचे पेटीएम केवायसी करायचे आहे, 10 रु. पेटीएम अकाउन्ट मध्ये पाठवा'' असे सांगितले. यावरून फिर्यादीने 10 रु. पेटीएम अकाउन्ट मध्ये पाठविले असता त्यांच्या एसबिआय अकाउन्ट सावनेर मधुन टप्या टप्याने 2,48,000/–रु आरोपीने वळते केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम सहकलम 66(सी) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री अशोक कोळी 9657811111 करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर